नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd
अंक - ८ | Issue - 8
वार - मंगळवार दि. २ जून २०२६ | Blow- Tuesday Date 2 JUNE 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल

## महायुती व महाविकास आघाडी अशी होणार थेट लढत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकीसाठी अखेर महायुतीचे अंतिम जागावाटप निश्चित झाले आहे. प्रचंड रस्सीखेच आणि जागांवरील दावे-प्रतिदाव्यानंतर १७ जागांसाठी तिन्ही पक्षांमध्ये एकमत झाले आहे. अंतिम फॉर्म्युलानुसार भाजप ११, शिवसेना ४ तर राष्ट्रवादी २ जागांवर निवडणूक लढवणार आहेत. यामध्ये भाजपकडून ११ उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर करण्यात आली आहे. तर शिवसेनेचे ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे २ उमेदवारांची नावंही जवळपास निश्चित झाले आहेत.

विधान परिषदेच्या निवडणुकामध्ये अंतिम जागावाटप निश्चित

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या ७५ टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते. विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात. सोलापूर, अहमदनगर, ठाणे, जळगाव, नांदेड, सांगली-सातारा, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, नाशिक, अमरावतीच्या स्थानिक संस्थेच्या विधान परिषदेच्या जागांसाठी निवडणूक होणार आहे.



विधानपरिषद निवडणूकीचा संपूर्ण कार्यक्रम-

निवडणुकीची अधिसूचना- २५ मे
अर्ज भरण्याची शेवटची तारीख- १ जून
उमेदवारी अर्जांची छाननी- २ जून
अर्ज माघारीची मुदत- ४ जून
मतदान- १८ जून (स.८ ते दु.४)
मतमोजणी- २२ जून

# नीट पेपर फुटीचा मास्टरमाईंड पी.व्ही. कुलकर्णीची चार मजली इमारत भुईसपाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बीड: देशभरात गाजलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने कारवाईचा वेग वाढविला दरम्यान, या घोटाळ्यातील प्रमुख आरोपी म्हणून समोर आलेल्या सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्या बीड शहरातील मालमत्तेवरही प्रशासनाने कारवाई केली आहे. शहरातील शाहूनगर भागात सुरू असलेल्या त्याच्या चार मजली इमारतीच्या बांधकामावर अखेर हातोडा चालविण्यात आला आहे.

नगरपालिका प्रशासनाने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे ठेकेदाराला ते स्वतःहून पाडून घेण्याची नोटीस बजावली होती. या नोटीसीची मुदत संपल्यानंतर आजपासून प्रत्यक्ष पाडण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. विशेष म्हणजे संबंधित ठेकेदाराकडूनच हे बांधकाम हटविले जात आहे. नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशभरात संतापाची लाट उसळली होती. सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. त्यात पी. व्ही. कुलकर्णी याचे नाव समोर आल्यानंतर सीबीआयने त्यांना अटक केली होती. त्यानंतर त्यांच्या बीडमधील मालमत्तांचीही चौकशी सुरू झाली. शाहूनगर येथील बांधकाम नियमबाह्य आढळून आल्याने पालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला असून अनधिकृत बांधकाम हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याचा आता मोठा फटका कुलकर्णीला बसल्याचे मानले जात आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी वर्षभर रात्रंदिवस मेहनत घेऊन प्रामाणिकपणे परीक्षेला सामोरे जातात. मात्र पैशांच्या जोरावर प्रश्नपत्रिका फुटत असतील, तर त्याचा सर्वात मोठा फटका मेहनती विद्यार्थ्यांनाच बसतो. त्यामुळेच या घोटाळ्यातील आरोपींवर होत असलेल्या कारवाईकडे संताप आणि समाधान या दोन्ही भावनांनी पाहिले जात आहे. सीबीआयच्या तपासात पी. व्ही. कुलकर्णी हा प्रमुख सूत्रधार असल्याचे समोर आले असून त्याच्यासह आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे. काही आरोपी सीबीआय कोठडीत असून संपूर्ण रॅकेटचा तपास सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी देशभरातून होत आहे.

# फसव्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटींवरही कारवाई करण्याचा तुकाराम मुंढेंचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील धडाकेबाजी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध विभागाचा पदभार स्वीकारल्यापासूनच कारवाईचा धडाका सुरू केला आहे. दोनच दिवसांत अन्न व औषध प्रशासनाचा चार्ज स्वीकारल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे चांगलेच क्शन मोडमध्ये आले असून अवैध गुटखा, भेसळयुक्त पदार्थांच्या दुकानांवर कारवाई केल्यानंतर आता पुढील अध्याय सुरू केल्याचं दिसून येतं. आत्तापर्यंत २८ दुकाने सील करण्यात आली असून ३३ आरोपींना अटकही करण्यात आल्याची माहिती आहे. आता, तुकाराम मुंढेंनी टीव्ही आणि पेपरात मिसलीडिंग डव्हर्टायझिंग करणाऱ्या सेलिब्रिटींवर कारवाई करण्याचा बडगा उगरला आहे. ब्रँड आणि मोठमोठी आश्वासने देत, फायदे दाखवत कंपन्यांकडून अनेकदा ग्राहकांची फसवणूक केली जाते. चुकीच्या आणि मिसलिडिंग जाहिराती दाखवून ग्राहकांना उत्पादन घेण्यास भाग पाडले जाते. मात्र, आता मिसलीडिंग डव्हर्टायझिंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आला आहे. यापुढे ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आता खपवून घेतल्या जाणार नाहीत, विशेष म्हणजे भ्रामक जाहिरातींमध्ये सहभागी सेलिब्रिटींवरही कारवाई होणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. ग्राहक संरक्षणासाठी प्रशासनाची आक्रमक भूमिका असणार आहे. त्यामळे, तुकाराम मुंढे पुन्हा आपल्या विभागात सक्रीय झाल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सर्वसामान्य नागरिकांकडून त्यांच्या या कर्तव्याचे कौतुक होत आहे.


उत्पादन तयार करणाऱ्या उत्पादकांपासून कारवाईला ह्या सुरुवात होणार आहे. ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर अन्न व औषध प्रशासनाची नजर राहणार आहे. मात्र, ग्राहकांपर्यंत जाहिरातीच्या माध्यमातून उत्पादन पोहोचवणाऱ्या या प्रक्रियेत सहभागी जाहिरातदार, उत्पादक आणि ब्रँड ॲम्बेसेडर सर्वांची जबाबदारी निश्चित होणार आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींविरोधात कठोर पावले उचलण्याचा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. भ्रष्टाचाराच्या गर्तेत अडकलेल्या यंत्रणेला शिस्त लावण्यासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी २५ मे रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाचा नवीन कार्यभार स्वीकारला आहे. पदभार हाती घेताच त्यांनी राज्यातील जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांना कडक इशारा दिला होता. त्यांनी सर्व विभागांतील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना तातडीने धाडी व जप्तीची विशेष मोहीम राबविण्याबाबत कडक निर्देश दिले. आयुक्तांच्या या आदेशानंतर यंत्रणेनं कमालीची तत्परता दाखवत बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या सर्वच विभागांमध्ये एकाच वेळी धडक कारवाई केली.

# लाडकी बहीण योजनेचा गैरलाभ घेणाऱ्या पुरुषांना माफी नाही! पैसे सरसकट वसूल करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची अत्यंत यशस्वी आणि महिलांना समाजात मान मिळवून देणारी योजना आहे. या योजनेसाठी जनतेचा पैसा वापरला जात असून त्याचे रीतसर ऑडिट होते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करून या योजनेचा गैरलाभ घेणाऱ्या पुरुषांना कोणत्याही परिस्थितीत माफी दिली जाणार नाही; त्यांच्याकडून पैसे वसूल केले जातील, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली.

मुंबईत आयोजित एका विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेच्या छाननी प्रक्रियेबाबत माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आम्ही कोणालाही जाणीवपूर्वक वगळलेले नाही. योजना सुरू करतानाच उत्पन्न आणि वयाचे निकष स्पष्ट होते आणि सुरुवातीला स्वयंघोषणेच्या आधारे महिलांना लाभ देण्यात आला. त्यानंतर ई-केवायसीसाठी वारंवार मुदतवाढ देऊन तब्बल आठ महिन्यांचा कालावधी देण्यात आला. परंतु, डेटाबेस तपासल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये तब्बल १४ हजार पुरुष, ५ लाख सरकारी कर्मचारी आणि १० लाख आयकर (इन्कम टॅक्स) भरणारे लोक आढळले आहेत. याशिवाय ४ ते ५ लाख लाभार्थी असे आहेत ज्यांच्या नावावर चारचाकी गाड्या आहेत. यातील अनेकांनी केवायसी टाळले होते, त्यामुळे त्यांचे पैसे तूर्तास थांबवण्यात आले आहेत.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, जनतेचा पैसा हा नियमानेच खर्च करावा लागतो आणि यावर 'कॅग'चे ऑडिट होते. त्यामुळे गैरप्रकार करणाऱ्या पुरुषांकडून आम्ही पैसे वसूल करणारच. मात्र, ज्या महिला तांत्रिक कारणांमुळे किंवा निकषांमुळे अपात्र ठरल्या आहेत, त्यांना माफी दिली जाईल आणि त्यांच्याकडून कोणतीही सक्तीची वसुली केली जाणार नाही. ज्या २५ लाख महिलांची केवायसी माहिती चुकली होती, ती सुधारून त्यांना थकीत निधी दिला जात आहे. तसेच पात्र महिलांसाठी आजही केवायसीची विंडो पुन्हा उघडायला सरकार तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लाडकी बहीण योजनेच्या यशावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, ही योजना महिन्याला १ हजार ५०० रुपये देण्यापुरती मर्यादित नाही, तर ती महिलांच्या सन्मानाशी आणि सक्षमीकरणाशी जोडलेली आहे. मुंबई बँकेच्या माध्यमातून ५ लाख महिलांना उद्योग उभारणीसाठी १ ते दीड लाखांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्याच्या कर्जाचा हप्ता लाडकी बहीण योजनेच्या पैशातून वळता केला जातो. केवळ १ हजार ५०० रुपये देऊन थांबणार नाही, तर पुढे हे मानधन २ हजार १०० रुपये केले जाईल. राज्यामध्ये जास्तीत जास्त 'लखपती दीदी' तयार करण्याचा आमचा संकल्प असून, सध्या आपण ५० लाख लखपती दीदींचा टप्पा गाठण्याच्या उंबरठ्यावर आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाबाबत विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी रोखठोक उत्तर दिले. ते म्हणाले, हा प्रश्न ४०-५० वर्षांपासूनचा आहे. मात्र, जेव्हा जेव्हा मी किंवा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झालो, तेव्हाच हे प्रश्न सुटले आहेत. ज्यांच्यात प्रश्न सोडवण्याची क्षमता असते, लोकांच्या अपेक्षाही त्यांच्याकडूनच असतात, असे ते म्हणाले. आरक्षण देताना दोन समाज एकमेकांसमोर आणायचे नाहीत आणि एकाचे काढून दुसऱ्याला द्यायचे नाही, हे आमचे वैचारिक तत्त्व पक्के आहे. संविधानाच्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांवर टिकणारेच आरक्षण मराठा समाजाला दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे काम अत्यंत चोख सुरू असून योग्य वेळी ते योग्य गोष्टी घडवतील. महायुतीत राहून पक्ष वाढवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. शिवसेना किंवा अन्य मित्रपक्षांच्या विस्ताराला भाजपचा कायम हिरवा कंदील असेल, त्यात भाजप कधीही आडकाठी आणणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. - उपमुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळणाऱ्या सुनेत्रा पवार यांच्या कौशल्याचे कौतुक करताना ते म्हणाले की, त्यांची आकलन शक्ती आणि अभ्यासू वृत्ती दांडगी असून, त्या कोणताही विषय लवकर समजून घेतात. येत्या एक-दोन वर्षांत त्या राजकारणात चांगली गती घेतील आणि आपल्या भूमिकेत यशस्वी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## सुप्रिया सुळे यांनी दिली पोर्टलची आकडेवारी

## प्रत्येक भगिनीला योजनेचा लाभ मिळालाच पाहिजे

# लाडकी बहीण योजनेतून तब्बल १ कोटी २५ लाख महिला अपात्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत आहे, त्याला कारण आहे ते यंदाच्या हफ्त्यात ५० लाखांहून अधिक लाडक्या बहिणींना पैसे मिळालेच नाहीत. लाडकी बहीण योजनेतून ८० लाख महिलांना विविध कारणास्तव वगळण्यात आल्याचं समोर आलं आहे. त्यानंतर, विरोधी पक्षातील नेत्यांनी जोरदार आवाज उठवला असून हा लाडक्या बहिणींवर अन्याय असल्याचं म्हटलं आहे. निवडणुकांवेळी सरकारने पात्रतेच्या निकषाला कात्री लावली होती, मात्र आता निकष देऊन लाडक्या बहिणींनाच योजनेसाठी कात्री लावण्यात येत असल्याचं दिसून येत आहे. विशेष म्हणजे, तब्बल १.२५ कोटीहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आल्याचं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

सुप्रिया सुळेंनी ट्विटरवर पोस्ट करत म्हटलंय की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरुवातीला २.३७ कोटी महिलांना लाभ दिल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला होता. डिसेंबर २०२४ पर्यंत या महिलांना तब्बल ₹१७ हजार ५०५ कोटींपेक्षा अधिक रक्कम वितरित झाल्याची माहिती देखील देण्यात आली. पुढे या योजनेअंतर्गत लाभार्थी संख्या २.४६ ते २.४८ कोटींपर्यंत गेल्याचे सांगण्यात आले, जो या योजनेचा उच्चांक होता. त्यानंतर श-घधउ बंधनकारक केल्यानंतर टप्प्याटप्प्याने लाभार्थी संख्या कमी होत गेली. माध्यमांमधील सध्याच्या आकडेवारीनुसार तब्बल ८० लाख महिला अपात्र ठरविण्यात आल्याचे सांगितले जात आहे आणि आता सुमारे १.६६ कोटी महिलांनाच योजनेचा लाभ मिळणार असल्याचे समोर येत आहे.




लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवरील प्रत्यक्ष आकडे पाहिले असता अर्जांची आणि मंजूर लाभार्थ्यांची संख्या आणखीच कमी दिसत आहे. पोर्टलवर एकूण अर्जांची संख्या फक्त १.१२ कोटी तर मंजूर अर्जांची संख्या फक्त १.०६ कोटी इतकीच दिसत आहे. म्हणजे डिसेंबर २०२४ मधील आकडेवारी गृहीत धरली तर तब्बल १.२५ कोटीहून अधिक महिलांना या योजनेतून अपात्र ठरविण्यात आले आहे, असे स्पष्टपणे दिसत आहे, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटलंय.

जर शासनानुसार आजही १.६६ ते १.६८ कोटी लाभार्थी असतील, तर पोर्टलवर त्यापेक्षा कमी आकडे का दिसत आहेत? सुरुवातीला जाहीर केलेले लाभार्थी नेमके कोण होते? पडताळणीदरम्यान एवढ्या मोठ्या प्रमाणावर महिलांना अपात्र का ठरवण्यात आले? या सर्व बाबींवर सरकारने स्पष्ट, सविस्तर आणि पारदर्शक भूमिका मांडणे आवश्यक आहे. जनतेच्या कष्टातून निर्माण झालेल्या कररूपी पैशांतून ही योजना चालविली जाते. त्यामुळे गेली वर्ष-दीड वर्ष सरकार अपात्र लाभार्थ्यांनाच जनतेचा पैसा वाटत होते का, असा अत्यंत गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे. ही संपूर्ण बाब मूळात या सरकारचे घोर अपयश उघड करणारी आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून सखोल चौकशी करण्यात यावी. या योजनेचे स्वतंत्र आर्थिक आणि प्रशासकीय ऑडिट देखील करण्यात यावे. प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेचा पैसा चुकीच्या पद्धतीने नेमका कोणाकडे वळवला गेला, यामध्ये कोण जबाबदार आहे आणि प्रत्यक्ष लाभार्थी कोण होते, याची संपूर्ण माहिती पारदर्शकपणे महाराष्ट्रासमोर आणली गेली पाहिजे, ही आमची ठाम मागणी आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील प्रत्येक भगिनीला 'लाडकी बहीण' योजनेचा लाभ नियमितपणे मिळालाच पाहिजे, अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. यासाठी विशिष्ट मुदतीत श-घधउ करण्याची अट महिलांसाठी अन्यायकारक ठरू नये. राज्यातील एकही पात्र महिला केवळ तांत्रिक कारणांमुळे या योजनेपासून वंचित राहू नये, याची जबाबदारी सरकारने प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे.

## संपादकीय....

### कारवाईचा बडगा

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची अत्यंत यशस्वी आणि महिलांना समाजात मान मिळवून देणारी योजना आहे. या योजनेसाठी जनतेचा पैसा वापरला जात असून त्याचे रीतसर ऑडिट होते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करून या योजनेचा गैरलाभ घेणाऱ्या पुरुषांना कोणत्याही परिस्थितीत माफी दिली जाणार नाही; त्यांच्याकडून पैसे वसूल केले जातील, असे नुकतेच मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोणालाही जाणीवपूर्वक वगळलेले नाही. योजना सुरू करतानाच उत्पन्न आणि वयाचे निकष स्पष्ट होते आणि सुरुवातीला स्वयंघोषणेच्या आधारे महिलांना लाभ देण्यात आला. त्यानंतर ई-केवायसीसाठी वारंवार मुदतवाढ देऊन तब्बल आठ महिन्यांचा कालावधी देण्यात आला. परंतु, डेटाबेस तपासल्यानंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये तब्बल १४ हजार पुरुष, ५ लाख सरकारी कर्मचारी आणि १० लाख आयकर (इन्कम टॅक्स) भरणारे लोक आढळले आहेत. याशिवाय ४ ते ५ लाख लाभार्थी असे आहेत ज्यांच्या नावावर चारचाकी गाड्या आहेत. यातील अनेकांनी केवायसी टाळले होते, त्यामुळे त्यांचे पैसे तूर्तास थांबवण्यात आले आहेत. जनतेचा पैसा हा नियमानेच खर्च करावा लागतो आणि यावर 'कॅग'चे ऑडिट होते. त्यामुळे गैरप्रकार करणाऱ्या पुरुषांकडून आम्ही पैसे वसूल करणारच. मात्र, ज्या महिला तांत्रिक कारणांमुळे किंवा निकषांमुळे अपात्र ठरल्या आहेत, त्यांना माफी दिली जाईल आणि त्यांच्याकडून कोणतीही सक्तीची वसुली केली जाणार नाही. ज्या २५ लाख महिलांची केवायसी माहिती चुकली होती, ती सुधारून त्यांना थकीत निधी दिला जात आहे. तसेच पात्र महिलांसाठी आजही केवायसीची विंडो पुन्हा उघडायला सरकार तयार आहे. ही योजना महिन्याला १ हजार ५०० रुपये देण्यापुरती मर्यादित नाही, तर ती महिलांच्या सन्मानाशी आणि सक्षमीकरणाशी जोडलेली आहे. मुंबई बँकेच्या माध्यमातून ५ लाख महिलांना उद्योग उभारणीसाठी १ ते दीड लाखांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्याच्या कर्जाचा हप्ता लाडकी बहीण योजनेच्या पैशातून वळता केला जातो. केवळ १ हजार ५०० रुपये देऊन थांबणार नाही, तर पुढे हे मानधन २ हजार १०० रुपये केले जाईल. राज्यामध्ये जास्तीत जास्त 'लखपती दीदी' तयार करण्याचा संकल्प असून, सध्या आपण ५० लाख लखपती दीदींचा टप्पा गाठण्याच्या उंबरठ्यावर आहे.

## भरउन्हात जनगणना केली, घरी येऊन पाणी पिताच कोसळले, शिक्षकाच्या मृत्यूनं छ. संभाजीनगर हादरले!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्रातील बहुतांश भागात उष्णतेचा कहर सुरू आहे. अशातच भारतीय जनगणनेचं काम सुरू आहे. भर उन्हात काम केल्याने काही शिक्षकांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचे प्रकार पुढे आले आहेत. अशातच छत्रपती संभाजीनगरमधून एक मन हेलावणारी बातमी आलीये. भर उन्हात जनगणना करून आल्यानंतर पाणी पिताच एक शिक्षक जागेवरच कोसळले. ते पुन्हा उठलेच नाहीत. किशोर नामदेव समुद्रे (वय ४३) असे या शिक्षकाचे नाव आहे. शहरातील भावसिंगपुऱ्याच्या भीमनगरात ही दुर्दैवी घटना घडली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

किशोर समुद्रे हे पीरबाजार परिसरातील भागीरथ प्राथमिक शाळेत गेल्या २५ वर्षांपासून कार्यरत होते. ते इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करत होते. शासनाच्या जनगणना मोहिमेंतर्गत त्यांच्याकडे बीड बायपास परिसरातील (झोन क्र. १०) मधील कामाची जबाबदारी सोपवण्यात आलेली होती.

शिक्षक किशोर यांनी शनिवारी दुपारपर्यंत जनगणनेचं काम केलं. त्यानंतर दुपारी दीड ते दोनच्या सुमारास ते भीम नगर-भावसिंगपुरा येथील घरी परतले. घरी आल्यानंतर पाणी प्यायले आणि त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. ते जागेवरच कोसळले. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, किशोर समुद्रे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ आणि बहीण असा परिवार आहे. रविवारी दुपारी भीम नगर स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली. मात्र, राष्ट्रीय कर्तव्यावर असताना त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या वारसांना योग्य ती मदत मिळावी, अशी मागणी शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. त्यासाठी रुग्णालय परिसरात सकाळापासूनच अनेकजण एकत्र आले होते.

# लैंगिक कामगार : अधिकार आणि सामाजिक न्यायाचा शोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी २ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून पाळला जातो. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अनेकदा दूर ठेवलेल्या, उपेक्षा, तिरस्कार, गैरसमज आणि भेदभावाचा सामना करणाऱ्या लाखो लैंगिक कामगारांच्या जीवनातील वास्तव, त्यांचे प्रश्न, त्यांच्या मानवी हक्कांची गरज आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा पुनर्विचार करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. लैंगिक कामगारांविषयी समाजात अनेक प्रकारच्या पूर्वग्रहदूषित कल्पना प्रचलित आहेत. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाकडे सहसा केवळ नैतिकता, परंपरा किंवा सामाजिक मूल्यांच्या चष्म्यातून पाहिले जाते. मात्र या दृष्टिकोनापलीकडे जाऊन त्यांच्याकडे एक नागरिक, एक मानव आणि मूलभूत अधिकारांचा हक्कदार म्हणून पाहणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन हा केवळ एका व्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचा दिवस नाही, तर मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समता, आरोग्य, सुरक्षा, लिंगन्याय आणि मानवाधिकार यांच्याशी निगडित व्यापक प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी आहे.

या दिवसाचा इतिहास १९७५ सालातील एका महत्त्वपूर्ण घटनेशी जोडलेला आहे. फ्रान्समधील ल्योन शहरात त्या काळात लैंगिक कामगारांवर पोलिसांकडून सातत्याने होणारे छापे, अटकसत्रे आणि अन्यायकारक वागणूक याविरोधात मोठे आंदोलन उभे राहिले. अनेक लैंगिक कामगारांनी सेंट-निझिएर चर्चमध्ये आश्रय घेत आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला. त्यांनी सुरक्षिततेची हमी, पोलिसी अत्याचारांपासून संरक्षण आणि मानवी सन्मानाची मागणी केली. या आंदोलनाने जगभरातील लैंगिक कामगारांच्या हक्क चळवळीला नवी दिशा दिली. त्यांच्या संघर्षाची आठवण म्हणून २ जून हा दिवस पुढे 'आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन' म्हणून ओळखला जाऊ लागला. आज या दिवसाचे स्वरूप जागतिक झाले असून अनेक देशांमध्ये या निमित्ताने परिसंवाद, जनजागृती कार्यक्रम, मानवी हक्क मोर्चे आणि धोरणात्मक चर्चांचे आयोजन केले जाते.

लैंगिक काम हा विषय सामाजिकदृष्ट्या संवेदनशील आणि अनेक स्तरांवर गुंतागुंतीचा आहे. विविध देश, संस्कृती, धर्म आणि सामाजिक व्यवस्थांमध्ये या विषयाकडे पाहण्याचे दृष्टिकोन वेगवेगळे आहेत. काही समाजांमध्ये लैंगिक कामाला नैतिक अधःपतनाचे प्रतीक मानले जाते, तर काही ठिकाणी ते एक प्रकारचे श्रम किंवा व्यवसाय म्हणून स्वीकारले जाते. या मतभेदांमुळे लैंगिक कामगारांच्या जीवनाविषयी वस्तुनिष्ठ चर्चा अनेकदा मागे पडते. प्रत्यक्षात लैंगिक कामगारांच्या जीवनातील प्रश्न हे त्यांच्या व्यवसायापेक्षा अधिक व्यापक आहेत. त्यामध्ये दारिद्र्य, सामाजिक विषमता, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या समस्या, हिंसा, कायदेशीर संरक्षणाचा अभाव आणि सामाजिक बहिष्कार यांसारख्या अनेक मुद्द्यांचा समावेश होतो.

भारतासह जगातील अनेक देशांमध्ये लैंगिक काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या मोठी आहे. या क्षेत्रात केवळ महिलाच नव्हे तर पुरुष, तृतीयपंथीय, ट्रान्सजेंडर आणि इतर लैंगिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तीही कार्यरत आहेत. त्यामुळे लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ महिलांच्या प्रश्नांपुरता मर्यादित राहत नाही. तो लिंगवैविध्य, सामाजिक समावेशकता आणि मानवी हक्कांच्या व्यापक चौकटीत समजून घेणे आवश्यक ठरते. विशेषतः तृतीयपंथीय समुदायाला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार यांचा अभाव असल्याने अनेकांना लैंगिक काम हेच उपजीविकेचे साधन म्हणून स्वीकारावे लागते. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून केवळ नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेणे म्हणजे सामाजिक परिस्थितीचे अपूर्ण आकलन होय.

लैंगिक कामगार या क्षेत्रात कसे येतात याची कारणेही विविध स्वरूपाची असतात. काही व्यक्ती आर्थिक गरजांमुळे हा व्यवसाय स्वीकारतात. काहींना कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी, मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी किंवा कर्ज फेडण्यासाठी हा मार्ग निवडावा लागतो. काही प्रकरणांमध्ये महिलांना फसवणूक, मानवी तस्करी, जबरदस्ती किंवा कौटुंबिक परिस्थितीमुळे या क्षेत्रात ढकलले जाते. काही व्यक्ती मात्र स्वतःच्या निर्णयाने हा व्यवसाय स्वीकारतात. त्यामुळे सर्व लैंगिक कामगारांच्या परिस्थितीला एकाच चौकटीत बसविणे योग्य नाही. त्यांच्या जीवनातील विविधता आणि अनुभवांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

समाजातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे लैंगिक कामगारांविषयी असलेला सामाजिक कलंक. अनेकांना वाटते की या व्यक्तींना समाजात सन्मानाचे स्थान मिळण्याचा अधिकार नाही. त्यांच्याशी संवाद साधताना लोक टाळाटाळ करतात. त्यांना भाड्याने घर मिळणे कठीण होते. अनेक वेळा त्यांची मुले शाळांमध्ये भेदभावाला सामोरी जातात. काही कुटुंबे आपल्या मुलांना अशा मुलांशी मैत्री करण्यासही परवानगी देत नाहीत. अशा प्रकारच्या सामाजिक बहिष्कारामुळे लैंगिक कामगार आणि त्यांच्या कुटुंबांचे मानसिक आरोग्य प्रभावित होते. सततच्या अपमानामुळे आत्मविश्वास कमी होतो आणि समाजापासून दूरावण्याची भावना निर्माण होते.

लैंगिक कामगारांच्या जीवनातील आणखी एक गंभीर समस्या म्हणजे हिंसा. ग्राहक, दलाल, गुन्हेगारी टोळ्या, स्थानिक गुंड, काही वेळा पोलिस यांच्याकडूनही त्यांना हिंसाचाराचा सामना करावा लागू शकतो. शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक स्वरूपाच्या हिंसेच्या घटना अनेकदा घडत असतात. परंतु सामाजिक कलंक आणि न्याय मिळण्याबाबतची अनिश्चितता यांमुळे अनेक पीडित व्यक्ती तक्रार करण्यास धजावत नाहीत. परिणामी, हिंसाचाराचे चक्र सुरूच राहते. कोणत्याही नागरिकाप्रमाणे लैंगिक कामगारांनाही सुरक्षिततेचा आणि न्याय मिळविण्याचा अधिकार आहे, ही बाब समाजाने मान्य करणे आवश्यक आहे.

आरोग्य हा लैंगिक कामगारांच्या जीवनाशी थेट संबंधित असलेला महत्त्वाचा मुद्दा आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग, एचआयव्ही/एड्स, प्रजनन आरोग्याच्या समस्या, मानसिक ताण, नैराश्य आणि व्यसनाधीनता यांसारख्या अनेक आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः एचआयव्ही प्रतिबंधाच्या क्षेत्रात गेल्या काही दशकांत अनेक स्वयंसेवी संस्था आणि आरोग्य विभागांनी महत्त्वाचे कार्य केले आहे. कंडोम वापराबाबत जनजागृती, मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन आणि उपचार सुविधा यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली आहे. तथापि, अजूनही अनेक ठिकाणी आरोग्यसेवा मिळविताना लैंगिक कामगारांना भेदभावाचा सामना करावा लागतो. डॉक्टर किंवा आरोग्य कर्मचारी त्यांच्याशी पूर्वग्रहदूषित वागणूक करतात. त्यामुळे आरोग्य सेवा सर्वांसाठी समान आणि सन्मानपूर्वक उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक आहे.

लैंगिक कामगारांच्या मानसिक आरोग्याचा प्रश्नदेखील दुर्लक्षित राहतो. सततचा सामाजिक तिरस्कार, असुरक्षितता, हिंसा, आर्थिक ताण आणि भविष्याबद्दलची अनिश्चितता यांमुळे अनेक व्यक्तींना नैराश्य, चिंता आणि भावनिक तणावाचा सामना करावा लागतो. मानसिक आरोग्याच्या सेवा या समुदायापर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. त्यामुळे समुपदेशन, मानसोपचार आणि मानसिक आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे आणि तो लैंगिक कामगारांनाही तितकाच लागू होतो.

लैंगिक कामगारांच्या मुलांचे जीवन अनेकदा संघर्षमय असते. समाजातील पूर्वग्रहांमुळे त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात अडथळे निर्माण होतात. काही मुलांना त्यांच्या पालकांच्या व्यवसायामुळे चिडवले जाते किंवा अपमानित केले जाते. परिणामी, अनेक मुले शिक्षण अर्धवट सोडतात. शिक्षणाचा अभाव म्हणजे पुढील आयुष्यातील संधींची कमतरता. त्यामुळे गरिबी आणि सामाजिक वंचिततेचे चक्र कायम राहते. या परिस्थितीत शासन, स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्रितपणे काम करून अशा मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिष्यवृत्ती, निवास सुविधा आणि भावनिक आधार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

मानवी तस्करी आणि लैंगिक काम या दोन भिन्न बाबी आहेत, हे स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. अनेकदा या दोन्ही गोष्टींची गल्लत केली जाते. मानवी तस्करी म्हणजे व्यक्तींना फसवून, धमकावून किंवा जबरदस्तीने शोषणासाठी वापरण्याची गुन्हेगारी प्रक्रिया होय. दुसरीकडे, काही व्यक्ती स्वतःच्या इच्छेने लैंगिक काम करतात. त्यामुळे मानवी तस्करीविरोधी उपाययोजना करताना स्वेच्छेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करीविरोधी लढा आणि लैंगिक कामगारांच्या मानवी हक्कांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

जगभरातील विविध देशांमध्ये लैंगिक कामाबाबत वेगवेगळे कायदे आहेत. काही देशांमध्ये हा व्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे आणि त्यावर विशिष्ट नियम लागू आहेत. काही देशांमध्ये अंशतः मान्यता आहे, तर काही ठिकाणी तो पूर्णपणे बेकायदेशीर आहे. प्रत्येक व्यवस्थेचे फायदे आणि मर्यादा आहेत. कायदेशीर मान्यता असलेल्या देशांमध्ये आरोग्य, सुरक्षा आणि कामगार हक्कांच्या दृष्टीने काही संरक्षण उपलब्ध असते. तथापि, केवळ कायदेशीर मान्यता दिल्याने सर्व समस्या सुटतात असे नाही. सामाजिक कलंक आणि भेदभाव यांवरही तितक्याच गांभीर्याने काम करणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती तुलनेने गुंतागुंतीची आहे. येथे लैंगिक काम स्वतःमध्ये थेट गुन्हा नाही, परंतु त्याच्याशी संबंधित अनेक कृतींवर कायदेशीर निर्बंध आहेत. त्यामुळे लैंगिक कामगार अनेकदा कायदेशीर अनिश्चिततेत जगतात. अलीकडच्या वर्षांत न्यायालयांनी लैंगिक कामगारांच्या मानवी प्रतिष्ठेचा आणि घटनात्मक अधिकारांचा पुनरुच्चार केला आहे. न्यायव्यवस्थेने स्पष्ट केले आहे की प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. हा दृष्टिकोन मानवाधिकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

लैंगिक कामगारांच्या सक्षमीकरणासाठी विविध स्वयंसेवी संस्था आणि समुदाय आधारित संघटना कार्यरत आहेत. या संस्था आरोग्य सेवा, कायदेशीर मदत, शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, समुपदेशन आणि जनजागृती यांसारख्या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देतात. अनेक ठिकाणी लैंगिक कामगारांनी स्वतःच्या संघटना स्थापन करून आपले प्रश्न मांडण्यास सुरुवात केली आहे. ही बाब त्यांच्या आत्मसन्मानासाठी आणि नेतृत्व विकासासाठी महत्त्वाची आहे. जेव्हा एखादा समुदाय स्वतःच्या प्रश्नांसाठी संघटित होतो, तेव्हा सामाजिक बदलाची प्रक्रिया अधिक प्रभावी ठरते.

स्त्रीवादी चळवळींमध्येही लैंगिक कामाविषयी भिन्न मतप्रवाह दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते हा व्यवसाय स्त्रियांच्या शोषणाशी संबंधित आहे, तर काहींच्या मते तो महिलांच्या स्वायत्ततेचा आणि निवडीच्या अधिकाराचा भाग आहे. या वादांमध्ये विविध मतभेद असले तरी लैंगिक कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मानवी हक्कांचे संरक्षण हा समान धागा दिसून येतो. त्यामुळे मतभेदांपलीकडे जाऊन त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात लैंगिक कामगारांच्या असुरक्षिततेचे वास्तव अधिक ठळकपणे समोर आले. लॉकडाऊनमुळे त्यांचे उत्पन्न अचानक बंद झाले. अनेकांकडे बचत नव्हती, सामाजिक सुरक्षा नव्हती आणि पर्यायी रोजगाराच्या संधीही नव्हत्या. परिणामी, हजारो कुटुंबांना अन्न, औषधे आणि निवाऱ्याच्या समस्या निर्माण झाल्या. या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनी मदतीचा हात पुढे केला. या अनुभवाने असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यंत्रणा किती महत्त्वाची आहे हे अधोरेखित केले.

आर्थिक सक्षमीकरण हा लैंगिक कामगारांच्या जीवनातील बदलाचा एक महत्त्वाचा मार्ग आहे. अनेक व्यक्तींना पर्यायी रोजगाराच्या संधी, कौशल्य प्रशिक्षण, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रमांचा लाभ मिळाल्यास त्यांचे जीवन अधिक स्थिर होऊ शकते. काही व्यक्तींना हा व्यवसाय सोडून इतर क्षेत्रांत काम करायचे असते, परंतु शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना संधी मिळत नाही. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुनर्वसन व कौशल्य विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. चित्रपट, दूरदर्शन मालिका, वेब मालिका आणि वृत्तांकनामध्ये लैंगिक कामगारांचे चित्रण अनेकदा रूढ कल्पनांवर आधारित असते. काही वेळा त्यांना गुन्हेगारी, नैतिक अधःपतन किंवा सनसनाटीपणाशी जोडले जाते. अशा चित्रणामुळे समाजातील पूर्वग्रह अधिक बळकट होतात. माध्यमांनी त्यांच्या जीवनातील वास्तव, संघर्ष, मानवी भावना आणि सामाजिक प्रश्न यांचे संतुलित व संवेदनशील चित्रण करणे आवश्यक आहे. जबाबदार पत्रकारिता समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

सामाजिक कार्याच्या क्षेत्रात लैंगिक कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा मानला जातो. सामाजिक कार्यकर्ते या समुदायासोबत काम करताना अधिकाराधारित दृष्टिकोन स्वीकारतात. त्यांच्या गरजा समजून घेणे, त्यांना उपलब्ध संसाधनांशी जोडणे, त्यांच्या नेतृत्व क्षमतेला प्रोत्साहन देणे आणि समाजातील भेदभाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हे सामाजिक कार्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते. सामाजिक न्यायाची संकल्पना तेव्हाच अर्थपूर्ण ठरते जेव्हा सर्वात वंचित घटकांनाही समान संधी उपलब्ध होतात.



आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध मानवी हक्क संघटना आणि जागतिक संस्था लैंगिक कामगारांच्या हक्कांसाठी कार्य करीत आहेत. त्यांचा भर आरोग्यसेवा, कायदेशीर संरक्षण, हिंसाचारापासून सुरक्षा आणि सामाजिक समावेशन यांवर असतो. या प्रयत्नांमुळे अनेक देशांमध्ये धोरणात्मक चर्चा सुरू झाल्या आहेत. तथापि, अजूनही अनेक समाजांमध्ये या विषयाविषयी खुलेपणाने चर्चा करण्यास संकोच वाटतो. त्यामुळे जनजागृती आणि संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान हा तिच्या व्यवसायावर अवलंबून नसतो. मानवी हक्कांची संकल्पना ही सर्वांसाठी समान आहे. लैंगिक कामगारांविषयी सहानुभूती, संवेदनशीलता आणि वास्तववादी दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. त्यांना केवळ दयेचे पात्र समजण्याऐवजी अधिकार असलेले नागरिक म्हणून स्वीकारणे ही लोकशाही समाजाची जबाबदारी आहे. त्यांच्या जीवनातील समस्या सोडविण्यासाठी केवळ कायदे किंवा योजना पुरेशा नाहीत; तर सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिन आपल्याला विचार करण्यास भाग पाडतो की सामाजिक न्याय म्हणजे नेमके काय? समानता म्हणजे केवळ संधींची समानता की सन्मानाचीही समानता? एखादी व्यक्ती समाजाच्या कोणत्या स्तरात राहते यावर तिच्या मानवी हक्कांचे मूल्य ठरू शकते का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपण अधिक समतामूलक आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजव्यवस्थेकडे वाटचाल करू शकतो. शिक्षण, जनजागृती, सामाजिक संवाद, संवेदनशील धोरणे आणि मानवी हक्कांविषयीची बांधिलकी यांद्वारे लैंगिक कामगारांचे जीवन अधिक सुरक्षित, सन्माननीय आणि न्याय्य बनविता येऊ शकते.

आजच्या काळात विकासाची संकल्पना केवळ आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित राहिलेली नाही. विकास म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे. समाजातील कोणताही घटक उपेक्षित राहू नये, हीच खरी लोकशाही आहे. लैंगिक कामगारांचा प्रश्न हा केवळ एका समुदायाचा प्रश्न नसून मानवी प्रतिष्ठा, सामाजिक समावेशन आणि न्याय यांची परीक्षा आहे. या समुदायाकडे पूर्वग्रहांच्या चष्म्यातून नव्हे, तर मानवतेच्या दृष्टीने पाहिले गेले पाहिजे.

आंतरराष्ट्रीय लैंगिक कामगार दिनाचे खरे महत्त्व याच ठिकाणी आहे. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की मानवी हक्क सार्वत्रिक असतात आणि ते कोणत्याही व्यवसाय, जात, धर्म, लिंग किंवा सामाजिक स्थितीवर अवलंबून नसतात. प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. या मूल्यांचा आदर करणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत समाज ठरतो. त्यामुळे २ जूनचा हा दिवस केवळ स्मरणदिन म्हणून नव्हे, तर सामाजिक संवेदनशीलता, मानवी प्रतिष्ठा आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीच्या संकल्पनेला बळ देणारा दिवस म्हणून साजरा केला जाणे आवश्यक आहे. अशा समताधिष्ठित, मानवतावादी आणि न्यायप्रिय समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आपल्या पातळीवर प्रयत्न करणे, हीच या दिवसाला खरी मानवंदना ठरेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# निफाडला जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशन ,क्रीडा प्रबोधिनी निफाड यांच्या वतीने स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा'चे आयोजन करण्यात आले होते,.. जिल्ह्यातील तब्बल २४ संघांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता,

या स्पर्धेत प्रथम क्रमांक ब्रह्म आडगाव,द्वितीय क्रमांक ब्रह्मा आडगाव बी, तृतीय क्रमांक रुद्र सिन्नर चतुर्थ क्रमांक क्रीडा प्रबोधिनी निफाड यांनी मिळविला.

मान्यवरांच्या उपस्थितीत कब्बडी स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना निफाड तालुकाप्रमुख तथा उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे उपस्थित होते. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास डोळ्यांसमोर ठेवून मैदानावर शौर्य आणि खिलाडूवृत्ती दाखवावी, असे मोलाचे मार्गदर्शन केल

या क्रीडा स्पर्धांसाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस संजय गाजरे, ज्येष्ठ मार्गदर्शक नंदलालजी चोरडिया, कुंदन हॉटेलचे संचालक स्वप्निल गोळे व महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनचे कार्यवाहक मोहन गायकवाड, भीमराव काळे, विलास निरभवणे, राजेंद्र सोमवंशी, यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेचे मुख्य आयोजक दत्तू रायते आणि विलास गायकवाडव, चेतन कुंदे यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. स्पर्धा शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अमोल अहिरे, आदित्य सूर्यवंशी, आणि साजिद शेख, अजय मेधने, शिवकुमार बोरगुडे,संकेत खताळे अमोल देवकर, संकेत बोरगुडे, मितेश जाधव निलेश पगारे, सोनू मंडलिक, विकास मुरकुटे, पियुष यादव,सोनू महतो, अनमोल यादव, सदा कांदळकर संस्कार वघुले, अमित निकम, साहिल केदारे,ऋषीकेश गडाख या युवा कार्यकर्त्यांनी व क्रीडाप्रेमींनी अहोरात्र कष्ट घेतले.

नफाड नगरीत या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक पद्धतीने पार पडल्या. या यशस्वी आयोजनामागे निफाड तालुक्यातील समस्त ग्रामस्थ, नगरसेवक, उपनगराध्यक्ष आणि क्रीडा रसिकांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी, क्रीडा प्रबोधनी निफाड परिवाराच्या वतीने या स्पर्धेत सहभागी झालेले सर्व संघ, क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानण्यात आले. सूत्रसंचालन विलास गायकवाड यांनी केले तर दत्तू रायते यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# शिवदास रिंढे समाजकारण आणि राजकारणाचा समतोल साधणारे नेतृत्व



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील ग्रामीण भागातील राजकीय आणि सामाजिक जडणघडणीत स्थानिक नेतृत्वाची भूमिका नेहमीच मोलाची राहिली आहे. अशाच जनमानसात आदराचे स्थान मिळवलेल्या नेतृत्वांपैकी एक महत्त्वाचे नाव म्हणजे शिवदास रिंढे पाटील . समाजकारण आणि राजकारण यांची सांगड घालत त्यांनी जनसेवेचा एक आदर्श पायंडा घालून दिला आहे.

त्यांच्या एकूणच जीवनप्रवासावर आणि सामाजिक-राजकीय कार्यावर टाकलेला हा एक विश्लेषणात्मक दृष्टिक्षेप:

**राजकीय प्रवास: सत्तेकडून सेवेकडे**

शिवदास रिंढे पाटील यांचा राजकीय प्रवास हा केवळ पदे मिळवण्यापुरता मर्यादित नसून, राजकीय सत्तेचा वापर लोककल्याणार्थ कसा करावा, याचा वस्तुपाठ आहे.

तळागाळातील संपर्क: सामान्य कार्यकर्त्यांशी थेट आणि जिव्हाळ्याचा संवाद ही त्यांची सर्वात मोठी राजकीय ताकद आहे. कोणत्याही मोठ्या पदाचा बडेजाव न बाळगता, ते जनतेसाठी नेहमीच 'सुलभ' राहिले आहेत.

सर्वसमावेशक नेतृत्व: राजकारण करत असताना त्यांनी कधीही जाती-पातीचे किंवा गट-तटाचे संकुचित राजकारण केले नाही. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याची त्यांची भूमिका राहिली आहे.

सामाजिक बांधिलकी: राजकारणाच्या पलीकडचे कार्य

राजकारण हे केवळ निवडणुकांपुरते मर्यादित असावे, पण समाजकारण हे निरंतर चालले पाहिजे, हा विचार शिवदास रिंढे पाटील यांच्या कार्यातून सातत्याने दिसून येतो.

शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे कैवारी: ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे, याची पूर्ण जाणीव असल्याने त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवला आहे. दुष्काळ किंवा अस्मानी संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यात ते अग्रेसर असतात.

शिक्षण आणि युवा सक्षमीकरण: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी त्यांनी विविध उपक्रम आणि संस्थांच्या माध्यमातून नेहमीच प्रोत्साहन दिले आहे.

सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला पाठबळ: स्थानिक पातळीवर तरुणांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून त्यांनी अनेक क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून तरुणाईला सकारात्मक दिशा देण्याचे काम केले आहे.

**एक सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व**

आजच्या आक्रमक आणि कलुषित राजकीय वातावरणात शिवदास रिंढे पाटील हे त्यांच्या शांत, संयमी आणि सुसंस्कृत स्वभावासाठी ओळखले जातात. विरोधकांवर टीका करतानाही त्यांची भाषा नेहमीच सनदशीर आणि मर्यादा राखणारी असते. कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करूनच त्यावर भाष्य करणे किंवा निर्णय घेणे ही त्यांची कार्यपद्धती आहे.

> **शिवदास रिंढे पाटील यांच्या रूपाने समाजाला एक असा नेता मिळाला आहे, जो सत्तेत असो वा नसो, जनतेच्या सुखादुःखात नेहमीच धावून जातो. त्यांचे सामाजिक आणि राजकीय कार्य हे आगामी पिढीतील तरुण कार्यकर्त्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे. भविष्यातही त्यांच्या नेतृत्वाखाली समाजाचा विकास अधिक वेगाने होईल, यात तीळमात्र शंका नाही.**
>
> **– राहुल सुखदेवराव साबळे (पत्रकार)**
> **मु पो.दरेगाव तालुका सिंदखेडराजा जिल्हा बुलढाणा**
> **मो. ७८२३०२९९४५**

# पालकमंत्री गोरे, मा. खासदार निंबाळकर यांनी केला नेम, परिचारकांचा केला गेम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर जिल्ह्यामध्ये भाजपची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्न केले व विधान परिषद निवडणुकीसाठी त्यांची उमेदवारी निश्चित मानले जात होती. मात्र सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री गोरे व माजी खासदार निंबाळकर व माजी आमदार सातपुते यांनी मुख्यमंत्र्यांची दिशाभूल केली. त्यामुळे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांची उमेदवारी हुकली व माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी देण्यात आली.

सोलापूरच्या राजकारणात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढत्या प्रभा मुळे अनेक राजकीय समीकरणे बदललेली. व जिल्हा परिषद पंचायत समिती महानगरपालिका आणि विविध स्थानिक निवडणुकांमध्ये घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे भाजपला संघटनात्मक बळ मिळाले असे त्यांच्या समर्थकाचे म्हणणे आहे, तो याच काळात अनेक जुन्या आणि नव्या निष्ठावंत नेत्यांना दावलेले जात असल्याची भावना जिल्ह्यात निर्माण झालेली विशेषता विधान परिषद निवडीच्या पार्श्वभूमीवर प्रशांत परिचारक यांना संधी न मिळाल्याच्या मुद्दा सोलापूरच्या राजकारणात मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.

प्रशांत परिचारक हे सोलापूर जिल्ह्यातील भाजपचे जुने आणि प्रभावी नेते म्हणून ओळखले जातात पंढरपूर मंगळवेढा परिसरात त्यांनी दीर्घकाळ संघटना उभारणी केली. व जिल्हा परिषद सहकार क्षेत्र स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण भागात यांचा स्वतंत्र प्रभाव राहिला आहे. अनेक निवडणुकीमध्ये पक्ष अडचणीत असताना परिचारक यांनी संघटना टिकून ठेवण्याचे काम केल्याची भावना त्यांच्या समर्थकांमध्ये आहे.

म्हणूनच विधानपरिषद निवडीच्या वेळी त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली होती पण सोलापूर जिल्ह्याला विधान परिषदेवर प्रतिनिधित्व मिळावी अशी भावना व्यक्त करताना स्वतः पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही सोलापूरला संधी मिळाली पाहिजे असे मत व्यक्त केले होते. पण त्या चर्चेमध्ये प्रशांत परिचारक यांचे नाव सर्वाधिक पुढे असल्याची राजकीय वर्तुळात बोलले ही जात होते.

परंतु प्रत्यक्ष उमेदवारी जाहीर होताना परिस्थिती वेगळीच दिसली व राज्यातील विविध राजकीय समीकरणे, व पक्षांतर्गत गडबजी आणि नेतृत्वाचा प्राधान्य क्रमामध्ये सोलापूरच्या दाव्याला अपेक्षित महत्त्व मिळाले नाही अशी चर्चा सुरू झाली त्यामुळे परिचारक समर्थकांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली.

राजकीय विश्लेषणाच्या मते हा प्रश्न केवळ एका व्यक्तीच्या उमेदवाराचा नव्हता तर सोलापूर जिल्ह्याच्या प्रतिनिधित्वाचा होता, पश्चिम महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांना विधान परिषदेवर स्थान मिळत असताना सोलापूर सारख्या मोठ्या जिल्ह्याला पुन्हा एकदा प्रतीक्षे करावी लागलेली स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.

या ठिकाणी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होऊ लागले जिल्ह्यातील प्रत्येक राजकीय निर्णयात प्रभावी भूमी घेणारे नेतृत्व विधान परिषदेसारख्या महत्त्वाच्या प्रश्नावर सोलापूरच्या बाजूने ठामपणे उभे राहील का असाही सवाल विरोधक आणि उपस्थित केला व काहींनी तर उघडपणे आरोप केला की जिल्ह्याच्या काही नेत्यांची राजकीय वजन वाढवणे म्हणून काही नावांना पुढे जाऊ दिले जात गेली नाही.

सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये भाजपला मोठे यश मिळाल्यानंतर पालकमंत्री गोरे यांचे राजकीय वर्चस्व अधिक मजबूत झाले व अनेक वृत्तामध्ये जिल्ह्यातील विजयाचे श्रेय त्यांना दिले गेले अशा परिस्थितीत विधानपरिषदेसाठी कोणाला संधी मिळणार याकडे संपूर्ण जिल्ह्याची लक्ष लागले होते.

परिचारक समर्थकाने म्हणणे असे होते की पक्षासाठी दशकांत दशक काम करणारे आणि ग्रामीण भागात मजबूत जनधारा असलेल्या नेतृत्वाला संधी देणे अपेक्षित होते मात्र प्रत्यक्षात वेगळी राजकीय गणित प्राधान्याने पाहिली गेली त्यामुळे निष्ठावंत पेक्षा समीकरणांना महत्त्व दिले अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये पसरली.

या घडामोडीचा परिणाम भाजपच्या अंतर्गत वातावरणात ही झाला व जिल्ह्याच्या आधीच विविध गट अस्तित्वात असलेली चर्चा हो तो विधान परिषदेतील निर्णयामुळे काही कार्यकर्ते आणि स्थानिक नेते अधिकारी नाराज झालेली बोलले गेले विशेषता ग्रामीण भागात परिचारक यांचा प्रभाव असल्यामुळे त्या नाराजीची पडसाद संघटनात्मक पातळीवर उमटू लागले.

त्यामुळे अनेक राजकीय जाणकार असे मत व्यक्त करतात की पालकमंत्री गोरे यांनी जिल्ह्यात निर्माण केलेल्या राजकीय प्रभाव सोबत सर्व गटांना विश्वासात घेण्याची भूमिका अधिक मजबूत केली नाही, तर भविष्यात ही नाराजी मोठ्या राजकीय आव्हानाला रूपांतरीत होऊ शकते व सोलापूरच्या राजकारणात परिचारक यांना विधान परिषदेत संधी न मिळाल्याचा मुद्दा हा केवळ एक निर्णय नसून जिल्ह्याची बदलते सत्ता समीकरणाची प्रतीक म्हणून पहिला जात आहे.

# शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत; पिकांच्या भवितव्याबाबत चिंता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ परिसरातील शेतकरी सध्या पावसाच्या प्रतीक्षेत असून पावसाअभावी शेतकरी हवालदिल झाले आहेत. यंदाच्या हंगामासाठी अनेक शेतकऱ्यांनी शेतीची मशागत करून पेरणीपूर्व तयारी पूर्ण केली आहे. मात्र अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पावसाच्या विलंबामुळे शेतातील ओलावा कमी होत असून काही ठिकाणी जमीन कोरडी पडू लागली आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पेरणी लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बियाणे, खते व इतर शेती साहित्य खरेदीसाठी खर्च केलेल्या शेतकऱ्यांना आता पावसाची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

हवामान विभागाकडून लवकरच पावसाची शक्यता वर्तविण्यात येत असली तरी प्रत्यक्ष पाऊस कधी होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. वेळेत पाऊस न झाल्यास पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

दरम्यान, परिसरातील शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून लवकरात लवकर दमदार पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त करीत आहेत.

# तुगाव व उंडरगाव येथील प्रकरणातील तपास अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सह आरोपी करून सदर प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : तुगाव ता.उमरगा येथील दलित तरुणास मारहाण व उंडरगाव तालुका लोहारा येथील अल्पवयीन दलित मुलीचे अपहरण प्रकरणातील तपास अधिकारी यांना सह आरोपी करून त्वरित निलंबित करावे व सदर प्रकरणाचा तपास जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे द्यावा असी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने धाराशीचे जिल्हाधिकारी यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

रिपाइं (आठवले) च्या वतीने जिल्हाधिकारी धाराशिव यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की तुगाव ता.उमरगा येथील आंबेडकरी चळवळीतील दलित तरुण भालचंद्र चोकोबा कांबळे यास येथील जातीवादी गावगुंड रोहित दीपक जोमदे, पंकज शंकर जोमदे,महेश गहिनीनाथ जोमदे व चांद अमीर फकीर सर्व राहणार तुगाव ता.उमरगा यानी संगणमताने कट रचून जबरदस्तीने मोटरसायकलवर बसवून रोहित जोमदे यांच्या शेतातील द्राक्ष बागेच्या लोखंडी पोलला बांधून लाथा बुक्कीने काठीने व चामडी कम रपट्ट्याने जातीय द्वेशभावनेतून बेदम मारहाण करून गंभीर जखमी केले.सदर प्रकरणी मुरूम पोलीस ठाणे येते गुन्हा दाखल असून तपास अधिकारी पोलीस उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार हे चुकीच्या पद्धतीने तपास करत असून आरोपींना अप्रत्यक्षरित्या सहकार्य करत असल्याचे दिसून येत आहे. घटना घडून पंधरा दिवस झाले तरी अद्याप मुख्य तीन आरोपी फरार आहेत. त्यांना अटकपूर्वक जामीन साठी पोलिसाकडूनच सहकार्य करत असल्याचे जाणवते. तरी या प्रकरणाती तपास अधिकारी सदाशिव शेलार यांना सह आरोपी करून त्यांना त्वरित निलंबित करावे व या प्रकरणाचा तपास जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात यावा आणि सदर प्रकरणातील सर्व फरार आरोपींना तात्काळ अटक करावे.

तसेच उंडरगाव तालुका लोहारा येथील एका दलित समाजातील अल्पवयीन सतरा वर्षाच्या मुलीचे अपहरण करून अज्ञात ठिकाणी असलेला आरोपी एक महिना झाले अजून लोहारा पोलिसांना सापडलेला नाही.

**रिपाइं (आठवले)ची मागणी**

या प्रकरणाचा तपासी उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार यांच्याकडेच आहे.सदर प्रकरणी ही तपास अधिकारी यांच्याकडून म्हणावा तसा तपास केला जात नाही. शिवाय यातील मुख्य दोन आरोपींना जामीन मिळवून देण्यास त्यांनी सहकार्य केले आहे. तरी याही प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देऊन या दोन्ही प्रकरणात आरोपींना सहकार्य करणाऱ्या तपास अधिकारी सदाशिव शेलार यांना त्वरित निलंबित करा अन्यथा या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन उभे केले जाईल याची नोंद घ्यावी. जिल्हाधिकारी धाराशिव यांना दिलेल्या लेखी निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राज्य कार्यकारणी सदस्य एस.के.चेले,जि.प. चे माजी समाज कल्याण सभापती हरीश डावरे, रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के जिल्हा सचिव एस.के. गायकवाड,,रिपाइंचे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, रिपाइंचे धीरज बेळंबकर यशवंत भंडारे,संजय कांबळे, सामाजिक कार्यकर्ते उमेश गायकवाड,अरविंद लोखंडे,नागसेन कांबळे, नीलकंठ कांबळे,सदाशिव कांबळे सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

सरद निवेदनाच्या प्रती माननीय नामदार रामदासजी आठवले साहेब सामाजिक न्याय तथा अधिकारता राज्यमंत्री भारत सरकार, माननीय देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य, माननीय संजय शिरसाट सामाजिक न्याय मंत्री महाराष्ट्र राज्य जिल्हा पोलीस अधीक्षक धाराशिव यांना माहितीस्तव देण्यात आलेल्या आहेत.

**समाजात जिव्हाळा आणि माणुसकी जपणारा अनोखा उपक्रम : खा. ज्योतीताई वाघमारे**

# सोलापुरात एक जून रोजी २७५ कुटुंबातील पाचशे जणांचा सामूहिक वाढदिवस सोहळा थाटात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित आणि माजी उपमुख्यमंत्री माननीय नामदार श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या जनसामान्य प्रति असलेल्या सेवाभावी लोकांनी भिमुख नेतृत्वातून प्रेरणा घेत मा श्री प्रकाश भाऊ राठोड (माजी सहाय्यक आयुक्त तथा विशेष कार्यकारी अधिकारी) यांच्या वतीने सोमवार दिनांक १ जून २०२६ रोजी सोलापूर येथे भव्य सामूहिक वाढदिवस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते याला लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिले होते वयात २७५ कुटुंबातील पाचशे लोकांचे सामूहिक वाढदिवस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते याला लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिले वाढदिवस तसे गुणवंत विद्यार्थ्यास सन्मान विविध शासकीय पदावर कार्य करून सेवानिवृत्त झालेल्या मान्यवरांचे सत्कार करण्यात आला आहे. अच्छा धाव पातळीच्या जीवनात माणूस मनापासून दूर जात असताना समाजात प्रेम जिव्हाळा बंधुभाव आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ, व्हावी, प्रत्येक सामान्य व्यक्तीचा वाढदिवस सन्मान आणि आनंदाने साजरा व्हावा या उदात्त भावनेतून हा आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला आहे असे मत यावेळी बोलताना राज्यसभा खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी व्यक्त केले.

वाढदिवस हा फक्त केक कापण्याचा क्षण नसून आपल्या माणसाच्या प्रेमात आणि सन्मानात जगण्याचा आनंद उत्सव आहे अशी भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केली. चाणक्य गुरुकुल बसव जंगम शेतकरी गट यांच्या संयुक्त विद्यमाने श्री काशिनाथ बदगुंकी समन्वयक सोहळ्यात एक दोन रोजी वाढदिवस असणाऱ्या सर्व व्यक्तींसाठी सामूहिक एक सेलिब्रेशन सन्मान सोहळा श्रेय भोजन तसेच आनंदी वातावरण विविध उपक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सोलापूरच्या कन्या नूतन खासदार ज्योतीताई वाघमारे, ज्येष्ठ समाजसेवक ब्रिजमोहन फोफलिया, नगरसेवक प्रियदर्शनी साठे सर शहरप्रमुख सचिन चव्हाण माजी नगरसेविका शैलाताई राठोड शिक्षक नेते वीरभद्र दरवाढ एम बी एस बी निवृत्त कार्यकारी अभियंता चंद्रकांत दिघे वीर मूर्ती बसवराज स्वामी तीर्थ यांच्या विविध मान्यवर उपस्थित होते यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थित हा कार्यक्रम पार पडला यामध्ये विविध मान्यवर पत्रकार शिक्षक सामाजिक कार्यकर्ते सहभागी वाढदिवस कारखाना सन्मान चिन्ह सन्मानपत्र मानाचा फेटा शाल आणि श्रीफळ पूर्वीचे रोप भेट देऊन गौरव करण्यात आले.

शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून जमण्याच्या सुखा दुखात कायम उभे राहणारी ताकद आहे व समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आपुलकी आणि माणुसकी पोहोचवण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आल्याची संयोजक प्रकाश राठोड यांनी सांगितले तालुक्यातील विद्यार्थ्यांना विविध प्रेरणादायी उपक्रम देऊन युवा जनजागृती करणार असल्याची त्यांनी सांगितले व भव्य सोहळ्यात सकाळी दहा ते दुपारी दोन वेळेस सिद्धेश्वर रिसॉर्ट फॅमिली गार्डन रेस्टॉरंट गजानन महाराज मंदिराजवळ सोरेगाव ते कुमठे रोड विजापूर रोड सोलापूर येथे संपन्न झाला उपस्थित सर्व वाढदिवस असलेल्यांची सामुहिक वाढदिवस केक कापून साजरे करण्यात आले व एक जून रोजी वाढदिवस असणाऱ्या नागरिकांनी तसेच त्यांच्या मित्र व नातेवाईक सहकारी आणि परिचितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धांत भडकुंब यांनी केले कार्यक्रमाचे समन्वय ड्रीम फाउंडेशनचे संस्थापक आदेश काशिनाथ भगत गुनखी यांनी स्वागत व आभार हिशोब पिरजादे यांनी मानले.

# स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद आमदार निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत यांनी अर्ज भरला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद आमदार निवडणुकीसाठी भाजपचे अधिकृत उमेदवार राजेंद्र राऊत यांना आज सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी खासदार ज्योतीताई वाघमारे, आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार राजन पाटील, आमदार सचिन कल्याण शेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, मा. शहाजी बापू पाटील, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, माजी आमदार दिलीप भाऊ माने, माजी सभापती रणजितसिंह शिंदे, सोलापूर भाजप शहराध्यक्ष नगरसेवक रोहिणी ताई तळवलकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि भाजप जिल्हाध्यक्ष चव्हाण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गोरी म्हणाली की कार्यकर्त्यांच्या उस्फुर्त प्रतिसादामुळे आणि अहमदपूर व उपस्थितीमुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा हा कार्यक्रम भाजपच्या संघटन शक्तीचे प्रभावी दर्शन घडवणारा ठरला पक्षाने राजेंद्र राऊत यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता, आगामी निवडणुकीत विजय निश्चित करण्याचा संकल्प अधिक दूर झाला आहे विकास भूमुख विचार आणि जनतेच्या विश्वास आणि जनतेचा व कार्यकर्त्यांचा उत्साहात पाहता आगामी निवडणुकीत विजय निश्चित करण्याचा संकल्प आणि दूर झाला आहे. विकासा भिमुख विचार आणि जनतेच्या विश्वासाच्या बळावर आपण सर्वजण मिळून विजयाचा निर्धार पूर्णत्वास नेऊन असा संकल्प सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री गोरे यांनी व्यक्त केला.

# काँग्रेसची खिल्ली पण बिनविरोधसाठी विरोधकांना बोलणार; सोलापुरात पालकमंत्र्यांचे प्रयत्न






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर विधान परिषदेसाठी शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल झाले सर्वांचे लक्ष लागलेल्या भारतीय जनता पार्टी करून माजी आमदार राजेंद्र राऊत यांची उमेदवारी दाखल झाली. भारतीय जनता पार्टीने शक्तिप्रदर्शन करून ही उमेदवारी दाखल केली.

पालकमंत्री जयकुमार गोरे माजी मंत्री आमदार विजयकुमार देशमुख आमदार सचिन कल्याणशेट्टी शिवसेनेच्या खासदार ज्योती वाघमारे, माजी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार दिलीप माने, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार राजन पाटील माढाचे नेते रणजितसिंह शिंदे, दीपक साळुंखे, प्रदेश नेते शहाजी पवार, महापौर विनायक कोंड्याला जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, सभापती चेतनसिंह केदार शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील बऱ्याच आमदारांना सोबत घेण्यात आले होते. त्यामध्ये सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, करमाळ्याचे आमदार नारायण पाटील यांचीही उपस्थिती जाणवली.

भारतीय जनता पार्टीकडे एकूण मतदानाच्या ५०% पेक्षा अधिक मते असून महायुतीतील एकनाथ शिंदे शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी असे जर एकत्रित मतांची संख्या पाहिली असता महायुती या निवडणुकीत प्रचंड मजबूत दिसून येते.

ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी आज असलेल्या इतर आमदारांची उपस्थिती पाहता पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. माध्यमांशी बोलताना पालकमंत्री गोरे यांनी काँग्रेसची खिल्ली उडवली. ते म्हणाले, मला एकाचा फोन आला काँग्रेसच्या उमेदवाराला दोन सुचक कमी पडले पण आम्ही म्हटले करून टाका काही अडचण नाही.

निवडणूक बिनविरोध होण्यासाठी वेळप्रसंगी आपण विरोधकांना नाही बोलू, विनंती ही करू कारण सोलापूर ने बिनविरोधचा आदर्श घालून द्यावा असेही जयकुमार गोरे बोलून गेले

**गोंदियाच्या आऊटरला प्रवासी रेल्वे थांबविण्याची गरज काय?**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : गोंदिया-बल्लारशाह असो की बल्लालशाह ते गोंदिया असो ही प्रवासी रेल्वे आहे. मग येता जाता गोंदिया आऊटरला विनाकारण थांबवून काय केले जाते. कोणता काम होतो थांबवून, याचे सूत्र काही समजत समजत नाही. म्हणून प्रवासी सवाल करतात. गोंदियाच्या आऊटरला प्रवासी रेल्वे थांबविण्याची गरज काय?

गोंदिया बल्लरशाह या मार्गावर तब्बल दिवसातून ४ रेल्वे धावत असतात. तसेच बल्लरशाह वरुन गोंदियाकडे ४ गाड्या धावत आहेत. परंतु या मार्गावर दररोजच माल वाहून नेणाऱ्या गाड्या आधी पास करतात. तसेच सुपरफास्ट एक्सप्रेस या गाड्या सुध्दा आधी पास करता असतात. यामुळे आणखीन उशिरा लोकल गाडी मुद्दाम उशिरा सोडतात. हे सबंधित विभागाचे चुकीचे आहे.

लोकल पॅसेंजर गाड्या ह्या वेळेवर सोडायला हवी. जेणेकरून प्रवास करणारे प्रवासी हे आपले काम पूर्ण करतील. कारण कर्मचारी, शिक्षक, व्यवसायीक,

**प्रवाशांचा सवाल : रेल्वे विभागाने माणसासाठी माणुसकी जपावी.**

विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, धंदेवाईक यांची कामात फारच बदल होतो. याला जबाबदार रेल्वे विभाग आहे.

**सेवा गेली खड्डात...!**

कोरोना काळापासून नागपूर मध्य रेल्वे बोर्ड यांचा अनागोंदी करभार सुरू आहे. नागरिकांच्या सेवेसाठी असणारी रेल्वे ही चालली नाही तरी चालेल पण माल वाहतूक करणारी मालगाडी पास केली जाते. म्हणजे जनतेच्या गरजांकडे सरकारचे तर नाहीच पण विभागाचेही लक्ष नाही. मुद्दाम असे प्रकार केले जातात. नागरिकांची सेवा गेली खड्डात असेच दिसून येते.

**नियत्रंकामुळे चालक झाले त्रस्त**

नागपूर रेल्वे बोर्ड यांच्या बेदखल रेल्वे नियंत्रण करणारे अधिकारी यांच्या फाजील कारभारामुळे रेल्वे चालविणारे चालक आणि कर्मचारी हे सुद्धा त्रासले आहेत. आठ तासाची नोकरी ही १२-१४ तास करावी लागते. अशाप्रकारे रेल्वे नियत्रंकामुळे चालक त्रस्त झाले आहे.

# कळंबमध्ये दिव्यांगाचा अपमान; आरक्षित सीट नाकारत दुसऱ्या बसने जाचा सल्ला!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ दिव्यांगांच्या सन्मानाच्या मोठमोठ्या घोषणा करत असताना प्रत्यक्षात मात्र दिव्यांग प्रवाशांनाच अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचा संतापजनक प्रकार दि . ३१ मे रोजी सकाळी १० वाजता कळंब ते लातूर बस गाडी ला जात असतांना कळंब बसस्थानकात घडली आहे. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या जागेवर सामान्य प्रवासी बसलेले असताना, संबंधित दिव्यांग प्रवाशाला जागा देण्याऐवजी तुम्ही उशिरा आला आहात, दुसऱ्या बसने जा असे सांगण्यात आल्याचा गंभीर आरोप लातूर आगाराच्या महिला वाहकांवर करण्यात आला आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे ज्या धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत, त्याच जिल्ह्यात दिव्यांगांच्या हक्कांची अशी पायमल्ली होत असल्याने एसटी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लातूर आगाराच्या बसमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या सीटवर दोन सामान्य प्रवासी बसले होते. संबंधित दिव्यांग प्रवाशाने नियमानुसार जागेची मागणी केली असता, महिला वाहक (क्रमांक १४२४०) यांनी आरक्षित सीट रिकामी करून देण्याऐवजी दिव्यांगालाच दुसऱ्या बसने जाण्याचा सल्ला दिला.

धक्कादायक बाब म्हणजे, मी याची ऑनलाईन तक्रार करतो असे सांगूनही संबंधित कर्मचाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नाही. आरक्षित सीटवर बसलेल्या प्रवाशांना उठविण्याचे धाडस न दाखवता दिव्यांग प्रवाशालाच बाहेर उभे राहण्याची वेळ आणण्यात आल्याने उपस्थित प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

शासनाने दिव्यांगांच्या सन्मानासाठी नियम केले आहेत की फक्त जाहिरातींसाठी? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. दिव्यांगांसाठी राखीव जागेवर सामान्य प्रवासी बसणार आणि हक्काची जागा मागणाऱ्या दिव्यांगालाच नकार मिळणार असेल, तर एसटी महामंडळातील नियम फक्त कागदावरच आहेत का? अशी चर्चा प्रवाशांमध्ये रंगली आहे.

**परिवहन मंत्र्यांच्या आदेशालाच ठेंगा? लातूर आगाराच्या महिला वाहकांवर गंभीर आरोप**

परिवहन मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिव्यांगांना सन्मानाने वागणूक देण्याचे आदेश दिलेले असताना काही मुजोर कर्मचाऱ्यांकडून त्यालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र दिसत आहे. अशा घटनांमुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असून दिव्यांगांच्या हक्कांवरच गदा येत आहे.

या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित महिला वाहकांवर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, तसेच दिव्यांग प्रवाशांचा अपमान करणाऱ्यांना कोणतेही अभय देऊ नये, अशी जोरदार मागणी प्रवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि दिव्यांग संघटनांकडून करण्यात येत आहे.

- **दिव्यांगांना सन्मानाने प्रवास हे फक्त जाहिरातीपुरतेच आहे का?**
- **आरक्षित सीटवर सामान्य प्रवासी आणि दिव्यांगाला 'दुसऱ्या बसने जा' – हा कोणता न्याय?**
- **लातूर आगारातील कर्मचाऱ्यांना शासनाच्या आदेशांची भीती राहिली नाही का?**
- **परिवहन मंत्र्यांच्या जिल्ह्यातच दिव्यांगांचा अपमान; जबाबदारांवर कारवाई होणार की अभय मिळणार?**
- **दिव्यांगांच्या हक्कांची पायमल्ली करणाऱ्यांवर एसटी प्रशासन कडक भूमिका घेणार का?**

# धम्म वाढण्यासाठी लोक आश्रयाची नितांत गरज : डॉ. विलास आढाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भीमा कोरेगाव : प्रज्ञासूर्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिलेल्या विज्ञानवादी धम्मविचाराने भारतातील बौद्धांनी जागतिक बौद्ध राष्ट्रांशी आपल्या विचारांची नाळ जोडून धम्म आचरण केले पाहिजे, तरच आपला सर्वांगीण विकास होईल, असा विश्वास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रोफेसर डॉ. विलास आढाव यांनी व्यक्त केला.

वाडेगाव (वाडे बोल्हाई, ता हवेली जि. पुणे) येथील बोधिवन बुद्ध विहारात आयोजित १० दिवशीय श्रामणेर शिबिराचा समारोपीय सोहळा ३१ मे २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला, याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारा बौद्ध धम्म. या विषयावरत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते .

डॉ आढाव पुढे म्हणाले की, सम्राट अशोकाच्या राजवटीत धम्माला राजाश्रय लाभला म्हणून धम्म जगात सर्वत्र प्रसरला. आज श्रीलंका आणि थायलंड या दोन देशांमध्ये धम्माला राजाश्रय मिळाल्याने धम्माची भरभराट होऊन ते देश जगाच्या नकाशावर १०० टक्के बौद्ध राष्ट्र म्हणून गणले गेलेले आहेत, मात्र भारतात धम्म वाढविण्यासाठी आता राजाश्रयापेक्षा 'लोकाश्रयाची' नितांत गरज आहे.

यावेळी नेस वाडिया महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वृषाली रणधीर यांचेही व्याख्यान झाले त्या म्हणाल्या की, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या विचाराचा वसा आणि वारसा घेऊन स्त्रियांनी अंधश्रद्धा न बाळगता आता तथागतांच्या विज्ञानवादी विचारांची कास जोपासून आर्थिक प्रगती केली पाहिजे, जितीन कांबळे यांनीही आपली अभ्यासपूर्ण मनोगते व्यक्त केली.आणि श्रामणेरांना धम्म मार्गावर निरंतर चालण्याची प्रेरणा दिली.

सदर शिबिरामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सुमारे ४० श्रामणेरगणांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन धम्म शिक्षणाचा आणि संस्कारांचा लाभ घेतला. सदर शिबिर आदरणीय पूज्य भदंत डॉ. नागघोष महाथेरो यांच्या कुशल नेतृत्वाखाली संपन्न झाले. गेल्या दहा दिवसांत पूज्य भदंत शाक्यपुत्र राहुल, पूज्य भदंत पय्यारखित, पूज्य भदंत धम्मानंद, पूज्य भदंत दीपधम्मो, पूज्य भदंत धम्मबोधी आणि पूज्य भदंत मिलिंद, पुज्य भंदंत संचितबोधी या भिक्षुगणांनी आणि शिंदे यांनी श्रामणेरांना धम्माचे अतिशय उत्तम व सखोल मार्गदर्शन केले. हे श्रामणेर शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, पालक आणि समाजातील दानशूर उपासकांनी विशेष परिश्रम घेतले.

**संघटनांची खरी ताकद सुख-दुःखात दिसते : डॉ. विश्वासराव आरोटे**

**मदतीचा हात देण्याचा निर्णय हा प्रेरणादायी आणि कौतुकास्पद**

# सुरगाणा येथील जळीतग्रस्त ९ कुटुंबांना आर्थिक मदत; वैदू समाज फाऊंडेशन, पत्रकार संघ व समर्थ गांवकरी समूहाचा मदतीचा हात!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सुरगाणा/प्रतिनिधी : संघटना ही केवळ नावापुरती नसून प्रत्येकाच्या सुख-दुःखात खंबीरपणे उभी राहणारी असते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले. सुरगाणा येथील जळीतग्रस्त ९ कुटुंबांना आर्थिक मदत व किराणा साहित्य वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल सुरगाणा परिसरात लागलेल्या आगीत काही कुटुंबांचे मोठे नुकसान झाले होते. या संकटग्रस्त कुटुंबांना पुन्हा उभे करण्यासाठी अखिल भारतीय वैदू समाज फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने आर्थिक मदत व जीवनावश्यक किराणा साहित्य प्रदान करण्यात आले.

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या प्रगतीसाठी मेहनत घेत असते; मात्र अचानक आलेल्या संकटामुळे अनेकजण खचून जातात. अशा वेळी समाज आणि संघटनांनी दिलेला आधार हा जिवाला नवी उभारी देणारा ठरतो. वैदू समाज आणि मराठा समाजातील जळीतग्रस्तांना मदतीचा हात देण्याचा निर्णय हा प्रेरणादायी आणि कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात अखिल भारतीय वैदू समाज फाऊंडेशनचे मार्गदर्शक पोलीस निरीक्षक दशरथजी आटकर, अखिल भारतीय वैदू सामाजिक संघटनेचे प्रांतिक अध्यक्ष डॉ. स्वामी शिरकूल, पी.एस.आय. दवंगे, सुरगाणा नगराध्यक्ष भारत आप्पा वाघमारे आणि नगरसेवक सचिन आहेर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. स्वामी शिरकूल यांनी सांगितले की, समाजावर दुःखद प्रसंग किंवा संकट आले तर संघटना संपूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभी राहील. जळीतग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन त्यांना नव्याने उभारी देण्याचा संकल्प संघटनेने केला आहे.

कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरीचे प्रतिनिधी अनिल पवार यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तर आभार प्रदर्शन नगराध्यक्ष भारत आप्पा वाघमारे यांनी केले.

यावेळी शामलिंग शिंदे (प्रदेशाध्यक्ष, वैदू समाज), साहेबराव पवार, पै. अशोक जाधव, ताया लोखंडे, अनिल सुरेश पवार, बावड्या धनगर, रामनाथ धनगर, एकनाथ भोये, अर्जुन शिंदे, रवी शिंदे, भारत शिर्के, संजय शिर्के, अंबिका शिंदे, मेघा शिंदे, शैला पवार, ज्योती शिंदे, भारती शिंदे, रेणुका शिंदे, प्रमिला भोये, केशव देशमुख, भिका मेघा यांच्यासह वैदू समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, या कार्यक्रमादरम्यान परिसरातील एका गरजू तरुणाच्या किडनी उपचारासाठीही रोख आर्थिक मदत देण्यात आली. या सामाजिक उपक्रमामुळे जळीतग्रस्त आणि गरजू कुटुंबांना दिलासा मिळाला असून संघटनांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले.







